महानगरपालिका, नगरपरिषद / नगरपंचायत
निवडणुकांमध्ये बहुसदस्यिय प्रभाग पध्दतीस अनुसरुन
नामनिर्देशनपत्र व मतपत्रिका यासंदर्भातील सुधारणा

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्रमांक- रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र. ८/का.५
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक - २०/९/२०११

**आदेश**

ज्याअर्थी; भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेड ए अन्वये राज्यातील नगरपालिका निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी;शासनाने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ५, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ चे कलम ९, आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १० मध्ये सुधारणा केली असून त्या सुधारणेनुसार महानगरपालिका, नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग पध्दती अंमलात आली आहे. मात्र त्या अनुषंगाने नामनिर्देशनपत्र व मतपत्रिका यामध्ये अनुषंगिक दुरुस्त्या झालेल्या नाहीत.

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १४(४), नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम,१९४८ च्या कलम ९बी (४), महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०ए(४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन आणि राज्य निवडणूक आयोगाने यापूर्वी यासंदर्भात काढलेल्या आदेशांचे अंशतः अधिक्रमण करुन

१) हे आदेश उपरोक्त अधिनियमांच्याअंतर्गत स्थापन झालेल्या व बहुसदस्यीय पध्दतीनुसार प्रभाग रचना झालेल्या यथास्थिती महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायतींच्या निवडणुकांसंदर्भात लागू असतील.

२) **प्रभागातील जागांना क्रमांक देणे -** बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीच्या अनुषंगाने प्रत्येक प्रभागातील प्रत्येक जागेला प्रभागाच्या क्रमांकासोबत यथास्थिती अ, ब, क, ड किंवा इ अशारितीने क्रमांक देण्यात येतील. उदा. प्रभाग क्रमांक ३५ मध्ये ३ जागा असतील तर त्या प्रभागामधील जागांना ३५-अ, ३५-ब व ३५-क असे संबोधण्यात येईल.

३) **नामनिर्देशनपत्र सादर करणे -** प्रत्येक जागेसाठी वेगवेगळे नामनिर्देशनपत्र भरणे आवश्यक राहील. तसेच प्रत्येक जागेसाठी स्वतंत्र अनामत रक्कम भरणे आवश्यक राहील. एका जागेसाठी एका व्यक्तीकडून जास्तीत जास्त ४ नामनिर्देशनपत्रे स्विकारण्यात येतील. एकाच जागेसाठी नामनिर्देशनपत्र स्विकारतांना अनामत रक्कम एकदाच स्विकारण्यात येईल.

बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमध्ये एक उमेदवार एका प्रभागातील एकाच जागेवर निवडणूक लढवू शकेल. तथापि, अन्य प्रभागातील जागेवर त्या उमेदवाराने निवडणूक लढविण्यास बंदी असणार नाही. एका उमेदवाराने एकाच प्रभागातील एकापेक्षा जास्त जागांसाठी नामनिर्देशनपत्र दाखल केल्यास छाननीच्यावेळी कोणत्या जागेची निवडणूक लढवायची आहे या विषयी उमेदवाराची लेखी इच्छा विचारात घेण्यात यावी. उमेदवाराने अशी इच्छा व्यक्त न केल्यास प्रथम प्राप्त झालेले वैध नामनिर्देशनपत्र विचारात घेण्यात यावे.

४) **नामनिर्देशनपत्राचा नमुना -**

महानगरपालिका निवडणूकांकरीता- अनुसूची -१ मध्ये विर्निदिष्ट केल्याप्रमाणे राहील.

नगरपरीषद/नगरपंचायत निवडणूकांकरीता-अनुसूची-२ मध्ये विर्निदिष्ट केल्याप्रमाणे राहील

५) **मतपत्रिकेचा रंग -** बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमध्ये मतदान यंत्रावर लावण्यात येणाऱ्या विविध जागांच्या मतपत्रिका मतदारांच्या चटकन लक्षात येण्यासाठी प्रत्येक प्रभागातील

प्रत्येक जागेसाठी वेगवेगळ्या रंगाच्या मतपत्रिका लावणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने प्रत्येक जागेच्या मतपत्रिकेचा रंग खालीलप्रमाणे राहील.

१) प्रत्येक प्रभागातील “अ” जागेची मतपत्रिका - पांढरा रंग.

२) प्रत्येक प्रभागातील “ब” जागेची मतपत्रिका - फिका गुलाबी रंग.

३) प्रत्येक प्रभागातील “क” जागेची मतपत्रिका - फिका पिवळा रंग.

४) प्रत्येक प्रभागातील “ड” जागेची मतपत्रिका - फिका नीळा रंग.

५) प्रत्येक प्रभागातील “इ” जागेची मतपत्रिका - फिका हिरवा रंग.

६) **मतपत्रिकेचा नमुना -** महानगरपालिका / नगरपरीषद / नगरपंचायत निवडणूकांकरीता मतपत्रिकेचा नमुना अनुसूची-३ मध्ये विर्निदिष्ट केल्याप्रमाणे राहील

आपला,

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१) सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२) सर्व विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन
३) सर्व महानगरपालिका आयुक्त
४) सर्व जिल्हाधिकारी
५) संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई
६) सर्व नगरपरिषदा / नगरपंचायती यांचे मुख्याधिकारी
७) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी / सर्व कार्यासने.
८) निवड नस्ती.

## अनुसूची - १ (महानगरपालिका)

## नामनिर्देशनपत्र

**(प्रस्तावक व अनुमोदनकर्ता आणि उमेदवार अथवा संबंधित अधिकारी यांनी भरावयाचे)**
**भाग एक**

आम्ही, याद्वारे ------------------------------ महानगरपालिका प्रभाग क्रमांक- ---------व जागा क्र.------- प्रभागाचे नांव (असल्यास) ---------------------- मधून निवडणुकीकरिता ----------------------------------- यांना उमेदवार म्हणून नामनिर्देशित करीत आहोत.

| | | |
|---|---|---|
| उमेदवाराचे नांव | : | -------------------------------------------- |
| वडिलांचे/पतीचे नांव | : | -------------------------------------------- |
| वय | : | -------------------------------------------- |
| व्यवसाय/धंदा | : | -------------------------------------------- |
| संपूर्ण पत्ता (उमेदवाराने आपला पोस्टाचा पत्ता नमूद करावा) | : | --------------------------------------------<br>--------------------------------------------<br>-------------------------------------------- |
| मतदार यादीमध्ये ज्या प्रभागात मतदार म्हणून उमेदवाराचे नांव नोंदवलेले आहे त्या प्रभागाचा क्रमांक आणि नांव | : | प्रभाग क्रमांक-------- प्रभागाचे नांव----------- |
| मतदार म्हणून उमेदवाराचे नांव ज्या प्रभागात नोंदवलेले आहे अशा वर उल्लेखिलेल्या प्रभागाच्या मतदार यादीचा भाग क्रमांक व अनुक्रमांक | : | भाग क्रमांक ---------- अनुक्रमांक----------- |
| अनुसूचित जाती, जमाती किंवा मागासवर्ग (अशा जातीच्या/जमातीच्या किंवा यथास्थिती मागासवर्गाच्या किंवा अशा प्रवर्गातील महिलांसाठी राखीव जागांकरिता जेंव्हा निवडणूक असेल तेंव्हा | | -------------------------------------------- |

(फक्त अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांनी भरावयाचे)

महिलांकरिता राखीव असलेल्या जागेकरिता निवडणूक आहे काय ? : ------------------------------------

प्रस्तावकाचे नांव : ------------------------------------ --------

प्रभागाच्या मतदार यादीतील प्रस्तावकाचा : भाग क्रमांक-------- अनुक्रमांक-------------

दिनांक : प्रस्तावकाची सही किंवा अंगठ्याचा ठसा

अनुमोदनकर्त्याचे नांव : ------------------------------------

प्रभागाच्या मतदार यादीतील अनुमोदनकर्त्याचा: भाग क्रमांक----------- अनुक्रमांक-----------

दिनांक : अनुमोदनकर्त्याची सही किंवा अंगठ्याचा ठसा

मी, याव्दारे सूचीत करतो की, निवडून आल्यास महानगरपालिका सदस्य म्हणून काम करण्यास मी तयार आहे.

दिनांक : उमेदवाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा

## उमेदवाराने करावयाचे घोषणापत्र

मी, याद्वारे असे घोषित करतो की, माझी या नामनिर्देशनास संमती असून, मी असेही घोषित करतो की, -

(अ) माझ्या वयाची --------- वर्षे पूर्ण झालेली आहेत.

(ब) महानगरपालिका सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी मी अपात्र नाही.

(क) मी महानगरपालिकेचा ठेकेदार नाही.

(ड) मी महानगरपालिकेस नियमानुसार देय असलेली कोणत्याही रक्कमेची थकबाकी शिल्लक ठेवलेली नाही.

दिनांक : उमेदवाराची सही किंवा अंगठयाचा ठसा

नांव ------------------

प्रभाग क्र.--------- जागा क्र.------- व प्रभागाचे नांव (असल्यास) --------

### भाग दोन

(अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा नागरिकांच्या मागासवर्गातील उमेदवाराने करावयाचे प्रतिज्ञापत्र)

(उमेदवाराने भरावयाचे)

मी, याद्वारे असे घोषित करतो की, मी, महाराष्ट्र राज्याच्या संबंधात ------------------ ---------------------------- या * अनुसूचित जात/अनुसूचित जमात/नागरिकांचा मागासवर्ग या प्रवर्गातील उमेदवार आहे.

दिनांक : उमेदवाराची सही किंवा अंगठयाचा ठसा

*लागू नसेल ते खोडावे.

टिपा :- (१) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिती नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरीता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढविणा-या व्यक्तीने नामनिर्देशनपत्रासोबत महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० च्या तरतूदींना अनुसरून सक्षम प्राधिका-याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र यांची सत्यप्रत सोबत जोडावी. तसेच

(२) नामनिर्देशनपत्राच्या छाननीच्यावेळी पडताळणीसाठी मूळ जाती प्रमाणपत्र व जात पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करावे.

## (निवडणूक चिन्हांच्या निवडीबाबतचे घोषणापत्र)

मी, याद्वारे आणखी असे घोषित करतो की, --

(अ) मी, या निवडणुकीमध्ये ------------------------------ *पक्ष ( राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, मुंबई याच्याकडे नोंदणी झालेल्या पक्षाचे नाव ) यांच्यातर्फे उभा आहे.

(ब) मी निवडलेली निवडणूक चिन्हे ही पसंतीक्रमानुसार पुढीलप्रमाणे आहेत :---

(१)

(२)

(३)

दिनांक : उमेदवाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा

टिपा :--(१) उमेदवारास कोणत्याही पक्षाने किंवा आघाडीने पुरस्कृत केले नसल्यास व तो अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवीत असल्यास बाब (अ) खोडून टाकावी.

(२) प्रत्येक उमेदवाराने, मग त्याला कोणत्याही पक्षाने किंवा आघाडीने पुरस्कृत केलेले असो वा नसो, बाब (ब) मधील तीन चिन्हे निर्दिष्ट करावयाची आहेत.

* लागू नसेल ते खोडावे.

## भाग तीन

नामनिर्देशनपत्राचा अनुक्रमांक ----------------------------------------

हे नामनिर्देशनपत्र, * उमेदवाराने / उमेदवाराच्या प्रस्तावकाने / अनुमोदनकर्त्याने ---------------------- रोजी (दिनांक) ----------------- वाजता (वेळ) माझ्याकडे माझ्या कार्यालयात सुपूर्द केले.

दिनांक : निवडणूक निर्णय अधिकारी यांची सही

## नामनिर्देशनपत्र स्वीकारणा-या किंवा फेटाळणा-या निवडणूक निर्णय अधिका-यांचा निर्णय

मी, --------------------------- अधिनियमाच्या कलम ------------------ नुसार हे नामनिर्देशनपत्र तपासले असून, पुढीलप्रमाणे निर्णय देत आहे :--

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

दिनांक : निवडणूक निर्णय अधिकारी यांची सही

* लागू नसेल ते खोडावे.

## भाग चार

(नामनिर्देशनपत्र व छाननीची नोटीस यांची पोहोच)
(नामनिर्देशनपत्र सादर करणा-या व्यक्तीकडे द्यावयाची)

नामनिर्देशनपत्राचा अनुक्रमांक --------------------- महानगरपालिका प्रभाग क्रमांक---------व जागा क्र.------- प्रभागाचे नांव (असल्यास) मधील निवडणूक उमेदवार ------------------------------------------ यांचे नामनिर्देशनपत्र ------------------- (दिनांक) रोजी ----------------- (वेळ) वाजता *उमेदवाराकडून / उमेदवाराच्या प्रस्तावकाकडून / अनुमोदनकर्त्याकडून माझ्याकडे माझ्या कार्यालयात सुपूर्द करण्यात आला आहे.

सर्व नामनिर्देशनपत्रांची ------------------------------------------ (ठिकाण) येथे -------------------- (दिनांक) रोजी -------------------- (वेळ) वाजता छाननी करण्यात येईल.

दिनांक : निवडणूक निर्णय अधिकारी यांची सही

*लागू नसेल ते खोडावे.

## अनुसूची - २ (नगर परिषद / नगर पंचायत)

## नामनिर्देशनपत्र

**(प्रस्तावक आणि उमेदवार अथवा संबंधित अधिकारी यांनी भरावयाचे)**
**भाग एक**

आम्ही, याद्वारे ------------------------------ नगरपारिषद / नगरपंचायत प्रभाग क्रमांक- ---------व जागा क्र.------- प्रभागाचे नांव (असल्यास) मधून निवडणुकीकरिता ---------------------------------- यांना उमेदवार म्हणून नामनिर्देशित करीत आहोत.

| | | |
|---|---|---|
| उमेदवाराचे नांव | : | ------------------------------------------ |
| वडिलांचे/पतीचे नांव | : | ------------------------------------------ |
| वय | : | ------------------------------------------ |
| व्यवसाय/धंदा | : | ------------------------------------------ |
| संपूर्ण पत्ता (उमेदवाराने आपला पोस्टाचा पत्ता नमूद करावा) | : | ------------------------------------------<br>------------------------------------------<br>------------------------------------------ |
| मतदार यादीमध्ये ज्या प्रभागात मतदार म्हणून उमेदवाराचे नांव नोंदवलेले आहे त्या प्रभागाचा क्रमांक आणि नांव | : | प्रभाग क्रमांक-------- प्रभागाचे नांव----------- |
| मतदार म्हणून उमेदवाराचे नांव ज्या प्रभागात नोंदवलेले आहे अशा वर उल्लेखिलेल्या प्रभागाच्या मतदार यादीचा भाग क्रमांक व अनुक्रमांक | : | भाग क्रमांक ----------अनुक्रमांक----------- |

अनुसूचित जाती, जमाती किंवा मागासवर्ग (अशा जातीच्या/जमातीच्या किंवा यथास्थितीमागासवर्गाच्या किंवा अशा प्रवर्गातील महिलांसाठी राखीव जागांकरिता जेंव्हा निवडणूक असेल तेंव्हा (फक्त अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांनी भरावयाचे) ------------------------------------

महिलांकरिता राखीव असलेल्या जागेकरिता निवडणूक आहे काय ? : ------------------------------------

प्रस्तावकांची नावे व प्रभागातील मतदार यादीतील अनुक्रमांक व सही :

| | नांव | अनुक्रमांक | सही |
|---|---|---|---|
| १. | -------------------------------- | -------------- | -------------- |
| २. | -------------------------------- | -------------- | -------------- |
| ३. | -------------------------------- | -------------- | -------------- |
| ४. | -------------------------------- | -------------- | -------------- |
| ५. | -------------------------------- | -------------- | -------------- |

मी, याव्दारे सूचीत करतो की, निवडून आल्यास नगरपारिषद / नगरपंचायत सदस्य म्हणून काम करण्यास मी तयार आहे.

दिनांक : 

उमेदवाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा

टीप :- राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केलेल्या व मान्यताप्राप्त राजकीय पक्षाकडून पुरस्कृत करण्यात आलेल्या उमेदवारांच्या बाबतीत केवळ एक प्रस्तावक आवश्यक राहील.

## उमेदवाराने करावयाचे घोषणापत्र

मी, याद्वारे असे घोषित करतो की, माझी या नामनिर्देशनास संमती असून, मी असेही घोषित करतो की, -

(अ) माझ्या वयाची --------- वर्षे पूर्ण झालेली आहेत.

(ब) नगरपरिषद / नगरपंचायत सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी मी अपात्र नाही.

(क) मी नगरपरिषद / नगरपंचायत ठेकेदार नाही.

(ड) मी नगरपरिषद / नगरपंचायतीस नियमानुसार देय असलेली कोणत्याही रक्कमेची थकबाकी शिल्लक ठेवलेली नाही.

दिनांक : उमेदवाराची सही किंवा अंगठयाचा ठसा

नांव ------------------

प्रभाग क्र.--------- जागा क्र.------- व प्रभागाचे नांव (असल्यास) --------

**भाग दोन**

(अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा नागरिकांच्या मागासवर्गातील उमेदवाराने करावयाचे प्रतिज्ञापत्र)

(उमेदवाराने भरावयाचे)

मी, याद्वारे असे घोषित करतो की, मी, महाराष्ट्र राज्याच्या संबंधात ------------------ ---------------------------- या * अनुसूचित जात/अनुसूचित जमात/नागरिकांचा मागासवर्ग या प्रवर्गातील उमेदवार आहे.

दिनांक : उमेदवाराची सही किंवा अंगठयाचा ठसा

*लागू नसेल ते खोडावे.

टिपा :- (१) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिती नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरीता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढविणा-या व्यक्तीने नामनिर्देशनपत्रासोबत महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० च्या तरतूदींना अनुसरून सक्षम प्राधिका-याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र यांची सत्यप्रत सोबत जोडावी. तसेच

(२) नामनिर्देशनपत्राच्या छाननीच्यावेळी पडताळणीसाठी मूळ जाती प्रमाणपत्र व जात पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करावे.

## (निवडणूक चिन्हांच्या निवडीबाबतचे घोषणापत्र)

मी, याद्वारे आणखी असे घोषित करतो की, --

(अ) मी, या निवडणुकीमध्ये ------------------------------ *पक्ष ( राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, मुंबई याच्याकडे नोंदणी झालेल्या पक्षाचे नाव ) यांच्यातर्फे उभा आहे.

(ब) मी निवडलेली निवडणूक चिन्हे ही पसंतीक्रमानुसार पुढीलप्रमाणे आहेत :---

(१)

(२)

(३)

दिनांक : उमेदवाराची सही किंवा अंगटयाचा उसा

टिपा :--(१) उमेदवारास कोणत्याही पक्षाने किंवा आघाडीने पुरस्कृत केले नसल्यास व तो अपक्ष

उमेदवार म्हणून निवडणूक लढवीत असल्यास बाब (अ) खोडून टाकावी.

(२) प्रत्येक उमेदवाराने, मग त्याला कोणत्याही पक्षाने किंवा आघाडीने पुरस्कृत केलेले

असो वा नसो, बाब (ब) मधील तीन चिन्हे निर्दिष्ट करावयाची आहेत.

* लागू नसेल ते खोडावे.

## भाग तीन

नामनिर्देशनपत्राचा अनुक्रमांक ---------------------------------------

हे नामनिर्देशनपत्र, * उमेदवाराने / उमेदवाराच्या प्रस्तावकाने / अनुमोदनकर्त्याने ---------------------- रोजी (दिनांक) ----------------- वाजता (वेळ) माझ्याकडे माझ्या कार्यालयात सुपूर्द केले.

दिनांक : निवडणूक निर्णय अधिकारी यांची सही

## नामनिर्देशनपत्र स्वीकारणा-या किंवा फेटाळणा-या निवडणूक निर्णय अधिका-यांचा निर्णय

मी, --------------------------- अधिनियमाच्या कलम -------------------- अनुसार हे नामनिर्देशनपत्र तपासले असून, पुढीलप्रमाणे निर्णय देत आहे :--

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

दिनांक : निवडणूक निर्णय अधिकारी यांची सही

* लागू नसेल ते खोडावे.

## भाग चार

(नामनिर्देशनपत्र व छाननीची नोटीस यांची पोहोच)
(नामनिर्देशनपत्र सादर करणा-या व्यक्तीकडे द्यावयाची)

नामनिर्देशनपत्राचा अनुक्रमांक --------------------- नगरपरिषद / नगरपंचायत प्रभाग क्रमांक- ---------व जागा क्र.------- प्रभागाचे नांव (असल्यास) मधील निवडणूक उमेदवार ------------------------------------------- यांचे नामनिर्देशनपत्र ----- ----------------- (दिनांक) रोजी ----------------- (वेळ) वाजता *उमेदवाराकडून / उमेदवाराच्या प्रस्तावकाकडून / अनुमोदनकर्त्याकडून माझ्याकडे माझ्या कार्यालयात सुपूर्द करण्यात आले आहे.

सर्व नामनिर्देशनपत्रांची --------------------------------------------- (ठिकाण) येथे -------------------- (दिनांक) रोजी -------------------- (वेळ) वाजता छाननी करण्यात येईल.

दिनांक : निवडणूक निर्णय अधिकारी यांची सही

*लागू नसेल ते खोडावे.

## अनुसूचि-३ (मतपत्रिकेचा नमुना)
## (महानरपालिका / नगरपरिषद / नगरपंचायत)

No. -----महानगरपालिका नगरपरीषद / नगरपंचायत सार्वत्रिक / पोट निवडणूक सन-------
प्रभाग क्र.----------- जागा क्र.---------------- (आरक्षण*)

---

१. आसरे विलास अनंत चिन्ह

---

२. आसरे विलास अनंत चिन्ह

---

३. आसरे विलास अनंत चिन्ह

---

* येथे आरक्षण उदा. अनुसूचित जाती / अनुसूचित जाती (स्त्री) / अनुसूचित जमाती / अनुसूचित जमाती (स्त्री) / नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग / नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री) / सर्वसाधारण स्त्रीयांसाठी / सर्वसाधारण नमूद करावे.